### डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे

# फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे – ४

## [ वरिष्ठ महाविद्यालय (Senior College)]

## शिष्यवृत्ती सूचना क्र. (१)२०२०-२१

शैक्षणिक वर्ष २०२० – २१ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी खुल्या (Open) संवर्गातून महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे त्या विद्यार्थ्यांनी शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील छत्रपती राजर्श्री शाहू महाराज शिष्यवृत्ती (EBC) शिष्यवृत्ती चा ऑनलाईन अर्ज खालील वेब साईटवर भरावा. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी २०२०-२१ शैक्षणिक वर्षा मध्ये SEBC व EWS अंतर्गत प्रवेश घेतला आहे त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज Open संवर्गातून म्हणजेच (EBC)या शिष्यवृत्ती साठी भरण्यात यावा.

( https://mahadbtmahait.gov.in )

तरी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती किंवा फ्रीशिप चा अर्ज ऑनलाइन भरून योग्य ती प्रमाणपत्रे आपलोड करून ऑनलाइनच महाविद्यालय वेरीफिकेशन करण्याकरिता दिनांक १५ जानेवारी पर्यन्त पाठवावेत आणि ज्या दिवशी महाविद्यालये सुरू होतील त्या नंतर महाविद्यालयातील वेळापत्रका प्रमाणे शिष्यवृत्ती कार्यालयात श्री. वसंत भांड व श्री. अमित पालकर यांच्याकडे जमा करावेत. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज स्वतः भरावा दुसऱ्या कोणाकडूनही भरून घेऊ नये.

(EBC) या शिष्यवृत्ती संदर्भात सर्व कोर्सेसची  माहिती असणारे परिपत्रक हे आपल्या महाविद्यालयाच्या [www.fergusson.edu](http://www.fergusson.edu) या वेब साईटवर आहे या परिपत्रकात समाविष्ट असणाऱ्या अभ्यासक्रमाच्या  विद्यार्थ्यांनाच हा अर्ज भरता येईल.

१. ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्याचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे. आधारकार्डला मोबाईल नंबर व विद्यार्थ्याचे बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे तसेच बँक खाते हे NPCI पोर्टल ला लिंक असणे अत्यावश्यक आहे त्या शिवाय शिष्यवृत्ती लाभाची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार नाही  तसेच महाविद्यालयाच्या खात्यावरहि जमा होणार नाही तसे आढळून आल्यास विद्यार्थ्यांकडून फी वसूल केली जाईल. याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

२. ऑनलाईन अर्ज भरताना आधार कार्डला लिंक असलेल्या मोबाईल वर OTP येतो तो Verified करावा.

३. खालील शिष्यवृत्ती/ फ्रीशिप चा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्याने http://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर लॉगीन करून त्यातील Profile मधील सहा टॅब (Personal Information, Address Information, Other Information, Current Course, Past Qualification, Hostel Details) व्यवस्थित भरणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी द्वितीय (SY) व तृतीय (TY) तसेच M.Sc. II प्रवेशीत आहेत अशा विद्यार्थीनी त्यांचे अर्ज नूतनीकरण करणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांनी मागील वर्षी भरलेली माहिती तपासून पहावी.

४. ऑनलाईन वेबसाईटवर ३५ प्रकारच्या शिष्यवृत्ती दिलेल्या आहेत त्यापैकी विद्यार्थ्याला लागू असलेल्या शिष्यवृत्तीचा

पर्याय निवडून त्या शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे आवश्यक आहे. उदा.

५.विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी मागील वर्षातील परीक्षेचे गुण भरताना टक्केवारी (उदा. % )मध्ये भरावे, CGPA मध्ये भरू नये.

६.शिष्यवृत्ती अर्ज संकेतस्थळावर भरून महाविद्यालयात जमा केल्या नंतर त्या अर्जा मध्ये काही त्रुटि आढळल्यास महाविद्यालयाकडून असे अर्ज दुरूस्ती करिता विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन परत पाठविले (Resend) जातील. परत पाठविलेले अर्ज विद्यार्थ्यांनी दुरूस्ती करून ताबडतोब महाविद्यालयाच्या लॉगिनला पाठवावेत व त्या अर्जाची प्रत महाविद्यालयात जमा करावी.

७.शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न आहेत की नाही याची पडताळणी / खातरजमा आधार पोर्टल https://resident.uidai.gov.in/bank-mapper या लिंक वरती जाऊन करावी, तसेच आधार अँक्टिव आहे किंवा नाही याबाबत देखील सादर पोर्टल वरुन खातरजमा करावी.

८.जे विद्यार्थी नियमित तारखेस अर्ज सादर करणार नाहीत त्यांना शासनाकडून शुल्क प्राप्ती होणार नाही व त्यांना उर्वरित शैक्षणिक शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरणे बंधनकारक राहील .

९.शिष्यवृत्ती अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी Under tacking चा फॉर्म ऑनलाइन वेबसाइट वरून डाउनलोड करून भरावा आणि त्या नंतर अपलोड करावा.

१० सर्व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना असे सूचित करण्यात येते की ऑनलाइन रजिस्ट्रेशन करतांना त्यांनी आपला स्वतःचा मोबाइल नं द्यावा आणि तो मोबाइल नं आधार कार्ड व बँक अकाऊंट यांच्याशी लिंक करावा, आणि सर्वात महत्वाचे जो मोबाइल नं रजिस्टर केला आहे तो कुपया बदलू नये, जर कोणी मोबाइल नं बदलला आणि शिष्यवृत्ती चे पैसे त्यांच्या बँक अकाऊंटला जमा झाले नाहीत तर त्याला तो विद्यार्थी जबाबदार असणार आहे.

**4) (EBC) Scholarship (Open) साठी :-**

**Director of Higher Education मध्ये**

- RajarashiChhatrapatiShahuMaharajShikshanShulkShishyavrutti Scheme (EBC)
- State Government Open Merit Scholarship
- Education Concession to the Children of Ex- Servicemen
- Education Concession to the Children Freedom Fighter
- Assistance to Meritorious Students Scholarship - Junior Level Assistance to Meritorious Students Scholarship - Senior Level
- Dr.PunjabraoDeshmukhVastigruhNirvahBhattaYojna DHE)
- Eklavya Scholarship

**दिनांक :१५/१२/२०२०**
**प्राचार्य**

**खुल्या (Open) संवर्गातील छत्रपती राजार्श्री शाहू महाराज (EBC) शिष्यवृत्ती साठी आवश्यक प्रमाणपत्र.**

१) रहिवाशी दाखला तहसीलदार अधिकाऱ्याने प्रमाणित केलेला.
२) उत्पन्न प्रमाणपत्र तहसीलदार अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले.
३) आधार कार्ड .
४) रेशन कार्ड .
५) बँक पासबुक झेरॉक्स विद्यार्थ्याचे.
६) आधार कार्ड आणि बँक अकाउंट लिंक असलेले प्रमाणपत्र.
७) फी चलन.
८) मागील वर्षाची गुणपत्रिका.
९) दोन पेक्षा जास्त अपत्यांनी शिष्यवृत्ती न घेतलेले पालकांचे हमीपत्र.